आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 04/03/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 74 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा-महापौर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर हे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचा ठसा उमटवत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात या शहराची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी हा चित्रपट महोत्सव उपयुक्त ठरणार असून शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**

**या माध्यमातून शहरातील कलाकार घडतील व शहराची सांस्कृतिक जडणघडण होण्यास मदत होईल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी, गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास मंडळ यांच्या संयुक्त सहकार्याने 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026' चे आयोजन 3 ते 5 मार्च 2026 या कालावधीत आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, महापालिकेचे उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, चित्रपट दिग्दर्शक सुजय डहाके, अभिनेता क्षितिज दाते, मुख्यमंत्री सहाय्यक शुभम सातकर, चित्रपट निर्माते विजय चौधरी, फिल्म सिटी मुंबईचे जनसंपर्क अधिकारी पंकज चव्हाण, प्रा. डॉ. पांडुरंग भोसले, विजय गुंड, डी. वाय. पाटील फेडरेशनचे विद्यानंद मानकर, मच्छिंद्र धुमाळ, दत्तात्रय गायकवाड यांच्यासह पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटीचे दत्ता गुंड, अभिषेक अवचार, डॉ. विश्वास शेंबेकर, जय भोसले, पूजा गुंड, श्रुती शेंबेकर यांच्यासह चित्रपट रसिक उपस्थित होते.

# जाहिरातीतून एसटी कमविणार 250 कोटी रुपये

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता केवळ प्रवाशांची नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल 250 कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**



एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या 310 व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, " एसटी महामंडळाची 251 आगारे आणि 610 पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर आहेत. सुमारे 12 हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज 50 ते 55 लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या 1 कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे."

चांद्यापासून बांद्यापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी 250 कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत कार्यरत असलेले जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नवीन परवानाधारकांकडे जाणार आहेत. सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी सुमारे 22 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. अशाप्रकारे "तिकीट विक्रीव्यतिरिक्त विविध पर्यायी स्रोतांमधून उत्पन्न निर्माण झाले, तर एसटीला भविष्यात तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही," असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 04/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ऑनलाईन शेअर गुंतवणुकीच्या आमिषाने 15.35 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका पुरूषाची 15 लाख 35 हजार 117 रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात भारतीय न्याय संहिता व माहिती तंत्रज्ञान अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




डिसेंबर 2025 ते जानेवारी 2026 दरम्यान फिर्यादी यांना व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामील करून शेअर्स व आयपीओमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

कॅपस्टोन' नावाच्या अॅपवर खात्यात 55 लाख रुपये शिल्लक असल्याचे दाखवण्यात आले. मात्र रक्कम काढण्यासाठी कर भरण्याच्या नावाखाली आणखी पैसे घेतल्यानंतर आरोपींनी संपर्क तोडला. त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

या प्रकरणाचा तपास पिंपरी चिंचवड पोलीस करीत असून आरोपी अद्याप फरार आहेत.

नागरिकांनी ऑनलाईन गुंतवणुकीबाबत सावध राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# "पोलीस आयुक्तांची भेट" उपक्रमाला सुरुवात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी "पोलीस आयुक्तांची भेट" हा विशेष उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना कोणतीही पूर्वपरवानगी न घेता पोलीस आयुक्त व वरिष्ठ अधिकाऱ्यांची थेट भेट घेऊन आपल्या तक्रारी, सूचना व अपेक्षा मांडता येणार आहेत.**




हा उपक्रम दर सोमवारी दुपारी 4 ते सायंकाळी 6 या वेळेत प्रेमलोक पार्क, चिंचवड येथील पोलीस आयुक्त कार्यालयात होणार असून यावेळी पोलीस आयुक्त, सह आयुक्त, अपर पोलीस आयुक्त व सर्व पोलीस उपायुक्त उपस्थित राहणार आहेत. नागरिक-केंद्रीत पोलीसिंग, तक्रार निवारणाला गती आणि प्रशासनाबद्दल विश्वास वृद्धिंगत करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे Pimpri Chinchwad Police Commissionerate तर्फे सांगण्यात आले आहे.

शहरातील नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच औद्योगिक प्रतिनिधींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एमबीबीएस प्रवेशाच्या नावाखाली 7.10 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : एमबीबीएस अभ्यासक्रमात मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका डॉक्टरची 7 लाख 10 हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




सप्टेंबर 2025 ते मार्च 2026 या कालावधीत आरोपीने स्वतःला एन. वाय. तासगावकर कॉलेजचा प्रतिनिधी असल्याचे भासवले. तसेच संबंधित कॉलेजचे बनावट वेबपेज तयार करून फिर्यादी यांच्या मुलीला एमबीबीएस प्रवेश देण्याचे आमिष दाखवले.

विश्वास संपादन करून आरोपीने ऑनलाईन व रोख स्वरूपात 7.10 लाख रुपये घेतले. मात्र प्रवेश न देता पैशांचा अपहार केल्याचे तसेच पैसे परत मागितल्यावर धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणाचा तपास पिंपरी चिंचवड पोलीस करीत असून आरोपी अद्याप फरार आहे. नागरिकांनी शैक्षणिक प्रवेशासंदर्भात फसव्या दलालांपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 04/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पहिल्या दिवशी प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय महोत्सव 2026 चा आज शुभारंभ झाला. धुलीवंदनचा सण उत्साहात साजरा होत असतानाही सिनेमाप्रेमींची पाऊले फिल्म फेस्टिव्हलकडे वळली. पहिल्याच दिवशी देश-विदेशातील दर्जेदार लघुपट आणि माहितीपट पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठी गर्दी झाली. सामाजिक, सांस्कृतिक, मानवी मूल्ये, निसर्ग, ओळख आणि परंपरा यांच्या विविध पैलूंना स्पर्श करणाऱ्या चित्रपटांनी प्रेक्षकांना अद्वितीय अनुभव दिला. सर्व चित्रपटांना प्रेक्षकांकडून उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला.**




पहिल्या दिवशी विशेषरित्या सादर झालेल्या काही उत्कृष्ट चित्रपटांमध्ये केकी, चक्री, इको चेंबर, द वेट वॉल, लॉस्ट साँग्स ऑफ सुंदरी, मलवाझी, अ हाफ ऑफ हाफ-हार्टेड, द मिरॅकल ऑफ लाईफ, व्हेन द बेल रिंग्स, तपस, इलिजिटिमेट, 1942 – द कलकत्ता केस, अत्तर, दारा, अ डे इन अ लाईफ, द शो मॅन, द सेव्हन्टींथ इयर आणि तोयम या बहुविध विषयांवर आधारित कलाकृतींचाही समावेश होता. प्रत्येक चित्रपटाने आपली वेगळी शैली आणि प्रामाणिक कथनशैलीमुळे प्रेक्षकांची मनं जिंकली.

यासोबतच प्रदर्शित झालेल्या कलाकृतींमध्ये गणपती तू सर्वोत्तम, बर्नार्ड अँड राशा: अ स्विस-इंडियन स्टोरी, पोळी, मनीथा शुभाव्वम, रेहान स्पेशल, मार्त्या, बादारे, काली, देविचंद्रगुपथम् आणि अ बोहेमियन आर्टिस्ट यांचा समावेश होता. दुपारच्या सत्रात अंतर (डिस्टन्स), सार रुट्स ऑफ हीलिंग, रोजेस आर, द लास्ट युग, अनंत (एंडलेस), वाट, ओवाशेसॉट – लॉस्ट इन पर्स्यूट, अग्निपरीक्षा, बस्तर से बाजार तक आणि द फिनिश लाईन यांनी विविध सामाजिक आणि भावनिक मुद्द्यांवर प्रभावी प्रकाश टाकला. सायंकाळच्या सत्रात प्रदर्शित झालेल्या म्यामबाई - परमिशन टू द गार्डियन्स ऑफ द फॉरेस्ट, कसागी कन्सिना कागदा, थ्री मायनस वन, स्लर, आणि ब्रेक द सायलेन्स या चित्रपटांनी निसर्गसंवर्धन, मानवी संघर्ष, आदिवासी जीवन आणि सामाजिक जबाबदारी यांवरील कथनशैलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

### 'तपस्', 'मलवाझी' आणि 'लॉस्ट साँग्स ऑफ सुंदरी' ने जिंकली प्रेक्षकांची मने

'तपस्', 'मलवाझी' आणि 'लॉस्ट साँग्स ऑफ सुंदरी' या तीन विशेष लघुपटांनी पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पहिल्या दिवशी प्रेक्षकांच्या मनावर खोलवर ठसा उमटवला.

'तपस्' कर्करोगाशी झुंज देणाऱ्या एका तरुण मुलाची विज्ञान आणि अध्यात्म यांच्या सहकार्याने घडलेली उपचारयात्रा अत्यंत स्पर्शून जाणाऱ्या पद्धतीने मांडतो; हा संघर्ष, जिद्द आणि आशावादाचा प्रवास आहे. 'मलवाझी' केरळमधील लोकश्रद्धा, परंपरा आणि विधींमधून उलगडणाऱ्या मानवी भावविश्वाची सांस्कृतिक खोली प्रभावीपणे दाखवतो, तर 'लॉस्ट साँग्स ऑफ सुंदरी' मुंबईच्या शहरीकरणामुळे कोळी समाजाची हरवणारी ओळख, त्यांची समुद्राशी असलेली नाळ आणि सुंदरि या पौराणिक प्रतीकाची कथा संवेदनशीलतेने समोर आणतो. तीनही चित्रपटांनी मानवी अनुभवांचे वेगवेगळे पण समानपणे हृदयस्पर्शी पैलू उलगडत प्रेक्षकांना भावनिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक स्तरांवर समृद्ध करणारा अनुभव दिला.

### 60-सेकंदांच्या दोन लघुपटांना प्रेक्षकांची विशेष दाद

महोत्सवात प्रदर्शित झालेल्या दोन 60-सेकंदांच्या विशेष लघुपटांना प्रेक्षकांनी मनापासून दाद दिली.

'अ हाफ ऑफ हाफ-हार्टेड' मध्ये रिओ द जानेरो शहरातील अव्यवस्थेचे विनोदी, व्यंगात्मक चित्रण दिसते जिथे शहरी जीवनातील साधे घटकही विचित्र आणि अपारंपरिक रूपात उभे राहतात, आणि गोंधळाला शहरात कायमची जागा मिळते.

तर 'व्हेन द बेल रिंग्स' मध्ये जंगलाच्या सान्निध्यातील एकाकी घरात राहणाऱ्या स्त्रीच्या शांत उपस्थितीतून अंतर्मनातील पोकळी, हरवलेल्या गोष्टींची ओढ आणि स्वीकृतीचा शोध यांची भावस्पर्शी मांडणी अनुभवायला मिळते.

दोन भिन्न संकल्पनांचे हे लघुपट, फक्त 60 सेकंदांतही, प्रेक्षकांना खोल विचारात पाडणारे ठरले.

# जुनी सांगवीत मध्यरात्री धारदार शस्त्राने हल्ला, तिघांविरोधात गुन्हा दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : जुनी सांगवी येथील ममता नगर परिसरात मध्यरात्री तिघांनी तरुणांवर धारदार शस्त्राने हल्ला करून दहशत माजविल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

2 मार्च रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास गणपती मंदिराजवळ ममता नगर लेन नं. 2 येथे फिर्यादी रोहित कांबळे व त्यांचे मित्र गप्पा मारत असताना, आरोपी दुचाकीवरून आले.




ओळख विचारण्याच्या कारणावरून शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आरोपींनी सोबत आणलेल्या सुऱ्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने वार केले.

यानंतर आरोपींनी परिसरात आरडाओरड करत दहशत निर्माण केली.

या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून, आरोपी अक्षय उर्फ जोग्या जाधव, अक्षय उर्फ बब्या जावळे व अर्जुन देवकांबळे (सर्व रा. जुनी सांगवी) यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आरोपी अद्याप फरार असून पुढील तपास पिंपरी चिंचवड पोलीस करीत आहेत.

# पीसीपीच्या आर्य माडीवाले याचा "ग्रॅव्हिटी २के२६ पिच परफेक्ट" स्पर्धेत द्वितीय क्रमांक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : एखाद्या दुकानात, शॉपिंग मॉलमध्ये खाद्य वस्तू खरेदी करताना त्याच्या दर्जा विषयी आपण संभ्रमात असतो, हा संभ्रम दूर करण्यासाठी पीसीपीच्या आर्य माडीवाले या विद्यार्थ्याने विकसित केलेले "फूड डी कोड ए आय" हे मोबाईल एप्लीकेशन सर्वसामान्यांसाठी उपयोगी ठरेल. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक आणि संशोधक वृत्ती विकसित व्हावी व त्यांच्या संशोधनाचा सामान्य नागरिकांना उपयोग व्हावा यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने सर्व संस्थांमध्ये उच्च दर्जाची शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला चालना मिळते. आर्य माडीवाले याने "ग्रॅव्हिटी 2के26 पिच परफेक्ट" या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला, याचा आम्हाला अभिमान वाटतो असे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले.

पुण्यातील के. जे. एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे ट्रिनिटी अकॅडमी ऑफ इंजिनीरिंग, पिसोळी या महाविद्यालयात "ग्रॅव्हिटी 2के26 - पिच परफेक्ट" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकचा (पीसीपी) विद्यार्थी आर्य माडीवाले याने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रू.30000/- रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पीसीईटी कार्यालयात आर्य माडीवाले याचा पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पीसीईटी च्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीपी प्राचार्या डॉ. विद्या बॅकॉड, संगणक विभाग प्रमुख मंगला माळकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत विविध इंजिनीरिंग कॉलेज मधून 180 पेक्षा अधिक स्पर्धक सहभागी होते. या स्पर्धेमध्ये हेल्थकेयर आणि बायोटेक, फिनटेक आणि ई कॉमर्स, ॲग्रीटेक आणि रुरल एम्पावरमेंट, सस्टेनेबल सोल्युशन्स आणि स्मार्ट सिटिज, स्किल्स आणि एज्युटेक अशा विषयांवर प्रकल्प सादर करायचे होते. यामध्ये पीसीपी मधील प्रथम वर्ष विद्यार्थी आर्य माडीवाले याच्या हेल्थकेअर आणि बायोटेक या विभागात 'फूड डिकोड ए आय' हे मोबाईल एप्लीकेशन ला द्वितीय क्रमांक मिळाला.

या ॲप्लिकेशन विषयी अधिक माहिती देताना आर्य माडीवाले यांनी सांगितले की, आपण एखाद्या दुकानात अथवा शॉपिंग मॉलमध्ये पॅकिंग केलेली खाद्य वस्तू खरेदी करताना त्यावरील बारकोड 'फूड डिकोड ए आय' या एप्लीकेशन मध्ये स्कॅन केला की, त्या वस्तू मधील न्यूट्री स्कोर फॅट व इतर माहिती ताबडतोब मिळते तसेच त्या खाद्य वस्तू ऐवजी अधिक चांगली पर्यायी दुसरी कोणती उपलब्ध आहे हे देखील समजते यामुळे आपण योग्य दर्जाची वस्तू खरेदी करू शकतो. खरेदी केलेल्या सर्व वस्तूंचे एकत्रित 'हेल्थ रेटिंग' यातील स्मार्ट कार्ट फीचर द्वारे ताबडतोब समजते.

तसेच हे एप्लिकेशन्स आपल्याला आरोग्य विषयक देखील मार्गदर्शन करते, जसे की मधुमेह असणाऱ्या व्यक्तीने कोणते पदार्थ खायला हवेत कोणते नको.

तसेच चॅट बॉट द्वारे देखील हे ॲप माहिती देते व मागदर्शन करते. हे एप्लीकेशन करण्यासाठी प्राचार्य विद्या बॅकॉड आणि आमच्या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# 'फुला'तून उलगडणार मुरळीची संघर्षमय कथा!!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**अस्सल मराठी मातीतल्या वाघ्या-मुरळीची संघर्षमय कथा आगामी 'फुला' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटाचं पोस्टर खंडेरायाच्या साक्षीने जेजुरी येथे वाघ्या-मुरळी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मार्तंड साठे यांच्या हस्ते लॉंच करण्यात आले याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते , दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थितीत होती. हा चित्रपट येत्या 17 एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे**




पै. अजित शिवाजी जाधव यांनी "फुला" या चित्रपटाची निर्मिती केली असून शिवशर्विल मूव्ही आणि बोधी सिनेमा यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे.अभिषेक जावीर दिग्दर्शित या चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे. सांगली जिल्ह्यातील आटपाडी गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक असलेल्या समाधान ऐवळे यांनी या चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शन केले आहे. अमर देवकर यांनी सर्जनशीर दिग्दर्शन, रवीकिरण जावीर, समाधान ऐवळे यांनी गीतलेखन, प्रताप जोशी यांनी छायांकन, अतुल लोखंडे यांनी कला दिग्दर्शन, राहुल प्रजापती यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. वेशभूषा कोमल जावीर, अक्षता पाटील तर रंगभूषा समाधान भोरे यांची आहे. गायिका वैशाली सामंत, वैशाली माडे, गायक रोहित राऊत, रवींद्र खोमणे, वैशाली इंगवले, वैष्णवी अदोडे, आकाश नवगिरे यांनी चित्रपटातील गाण्यांना आवाज दिला आहे. प्रियांतिका, आरोही गडदे, मंजुषा खेत्री, संतोष शिंदे, देवा गाडेकर, रविकिरण जावीर, सनी कदम, छाया आदट, शरद लांडगे या नव्या दमाच्या कलाकारांचा उत्तम अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण आणि टीम ही आटपाडी गावातील असून त्यांचा हा पहिलाच चित्रपट आहे.

“फुला" ही एका मुरळीच्या पोटी जन्मलेल्या निरागस मुलीची संघर्षमय कथा आहे. तमाशा फड, जागरण गोंधळ या पारंपरिक सांस्कृतिक पटावर आधारित ही गोष्ट महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतून आकार घेते. चित्रपटाविषयी दिग्दर्शक अभिषेक जावीर म्हणाले, "फुला" हा चित्रपट म्हणजे केवळ एका मुलीची शोकांतिका नाही, तर तो महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांमध्ये अडकलेल्या स्त्री कलाकारांच्या अस्तित्त्वाचा जीवंत दस्तावेज आहे. मुरळी परंपरेत अनेक स्त्रियांना कधीही त्यांची स्वप्नं, हक्क, प्रेम, सन्मानाने जगण्याची संधी मिळत नाही. समाज त्यांची कला घेतो, पण त्यांना माणूस म्हणून जगू देत नाही. वास्तवाचं प्रामाणिकपणे चित्रण करण्याचा प्रयत्न या चित्रपटाद्वारे केला आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968